-: प्रेसनोट :-

वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई यांनी १४ ग्रॅम वजनाचा व अं.कि. २ लाख १० हजार रूपये किमतीचा ''एमडी'' (मेफेड्रोन) (एम.डी) हा अंमली पदार्थ जप्त केलेबाबत.

वांद्रे पोलीस ठाणे हदद्ीत दिनांक १६/१०/२०२६ रोजी ०३:१५ वाजताचे सुमारास कुरेशी नगर मैदान, एस व्ही रोड,वांद्रे पश्चिम मुंबई ५० येथे वांद्रे पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी सपोनि राजेंद्र नांगरे व पो.ह.क्र.०३११६६/माने, पो.ह.क्र.०८.१३६०/वाणी, पो.ह.०८.१७०१/भोगले व पो.ह. ०९.०१३३/गुरव असे पथक गस्त करीत असताना गुन्ह्याचे घटनास्थळी कलीम शमीम शेख, वय-३२ वर्षे याचे ताब्यात एकुण १४ ग्रॅम इतक्या वजनाचा ''एमडी'' (मेफेड्रोन) हा अंमली पदार्थ मिळून आल्याने सदरचा अंमली पदार्थ हा घटनास्थळी दोन पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करून जप्त करण्यात येवुन वांद्रे पोलीस ठाणेस गु.र.क्र. २२०२/२०२६ कलम- ८(क) सह २२(ब),२९ अंमली पदार्थ विरोधी कायदा १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयात नमुद इसमास अटक करण्यात आली.

आरोपी कलीम शमीम शेख, वय-३२ वर्षे यास विश्वासात घेवुन त्याचेकडे केलेल्या तपासात त्याने महीला नामे निलोफर सॅंडोले, वय ५० वर्षे व तिचा साथीदार फिरोज शेख उर्फ फिरोज चिकना, वय ६१ वर्षे यांचेशी संगणमत करून सदरचा अंमली पदार्थ विक्री करत असल्याचे सांगितले. नमुद आरोपीने दिलेल्या माहितीनुसार महीला नामे निलोफर सॅंडोले, वय ५० वर्षे व तिचा साथीदार फिरोज शेख उर्फ फिरोज चिकना, वय ६१ वर्षे यांचा वांद्रे पोलीस ठाणे हद्दीत शोध घेतला असता ते मिळुन आल्याने त्यांना देखील नमुद गुन्हयात अटक करण्यात आली.

सदरची कारवाई मा. श्री. अभिनव देशमुख, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मा. श्री. डॉ. मोहित कुमार गर्ग, पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ-२, मुंबई, मा. श्री. अधिकराव पोळ, सहा. पोलीस आयुक्त, वांद्रे विभाग, मुंबई यांनी केलेल्या मार्गदर्शनाखाली वांद्रे पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. रविंद्र साळुंखे, पोलीस निरीक्षक अजय लिंगनूरकर तसेच वांद्रे पोलीस ठाणे येथील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी सपोनि राजेंद्र नांगरे व पो.ह.क्र.०३११६६/माने, पो.ह.क्र.०८. १३६०/वाणी, पो.ह.०८.१७०१/भोगले व पो.ह. ०९.०१३३/गुरव यांनी पार पाडली असुन गुन्ह्याचा पुढिल तपास मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. राजेंद्र नांगरे हे करीत आहेत.
